**एकात्मिक रोग सर्वेक्षण कार्यक्रम, महाराष्ट्र**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**नवीन करोना विषाणू (कोविड -१९) - सद्य:स्थिती आणि उपाययोजना**
**दिनांक ३० नोव्हेंबर २०२१**
**प्रेस नोट**

---

**थोडक्यात महत्वाचे -**

- आज ९४२ रुग्ण बरे होऊन घरी, राज्यात आजपर्यंत एकूण ६४,८३,४३५ करोना बाधित रुग्ण बरे होऊन घरी. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण (Recovery Rate) ९७.७१% एवढे झाले आहे.
- आज राज्यात ६७८ नवीन रुग्णांचे निदान.
- राज्यात आज ३५ करोना बाधित रुग्णांच्या मृत्यूंची नोंद .सध्या राज्यातील मृत्यूदर २.१२% एवढा आहे.
- आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ६,५५,११,३९४ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ६६,३५,६५८ (१०.१३ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत.
- सध्या राज्यात ८३,४२१ व्यक्ती होमक्वारंटाईनमध्ये आहेत तर ९६३ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत.

**राज्यातील ऍक्टीव्ह रुग्ण -**

राज्यात आज रोजी एकूण ७,५५५ ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. राज्यातील जिल्हानिहाय ऍक्टिव्ह रुग्णांचा तपशील खालील प्रमाणे आहे –

| अ.क्र. | जिल्हा | बाधित रुग्ण | बरे झालेले रुग्ण | मृत्यू | इतर कारणामुळे झालेले मृत्यू | ॲक्टिव्ह रुग्ण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | ७६२८७४ | ७४१९६१ | १६३३६ | २५४८ | २०२९ |
| २ | ठाणे | ६१३८४७ | ६०११५७ | ११५७० | ३५ | १०८५ |
| ३ | पालघर | १३८६१९ | १३५१५९ | ३२९८ | १५ | १४७ |
| ४ | रायगड | १९६६९३ | १९१७९९ | ४७०३ | ७ | १८४ |
| ५ | रत्नागिरी | ७९१११ | ७६५५८ | २४९१ | ५ | ५७ |
| ६ | सिंधुदुर्ग | ५२९५३ | ५१३९७ | १४४१ | १५ | १०० |
| ७ | पुणे | ११६०९८९ | ११३९०२० | १९७०७ | ३५० | १९१२ |
| ८ | सातारा | २५११०६ | २४४४९७ | ६४७५ | ३१ | १०३ |
| ९ | सांगली | २०९८९४ | २०४१८४ | ५६२९ | ९ | ७२ |
| १० | कोल्हापूर | २०६८०२ | २००९१८ | ५८४८ | ५ | ३१ |
| ११ | सोलापूर | २११९४५ | २०५२८५ | ५५८० | १११ | १६९ |
| १२ | नाशिक | ४१२११२ | ४०३०४३ | ८७१९ | १ | ३४९ |
| १३ | अहमदनगर | ३४१६४३ | ३३३६११ | ७१२६ | ११ | ८९५ |
| १४ | जळगाव | १३९९७७ | १३७२२३ | २७१४ | ३२ | ८ |
| १५ | नंदूरबार | ४००१९ | ३९०६३ | ९४८ | ३ | ५ |
| १६ | धुळे | ४६१८७ | ४५५२० | ६५५ | ११ | १ |
| १७ | औरंगाबाद | १५५६१९ | १५१२५३ | ४२५४ | १४ | ९८ |
| १८ | जालना | ६०७१५ | ५९४७३ | १२१० | १ | ३१ |
| १९ | बीड | १०३९९६ | १०११२१ | २८२८ | ७ | ४० |
| २० | लातूर | ९२२९८ | ८९८१२ | २४४१ | ६ | ३९ |

| अ.क्र. | जिल्हा | बाधित रुग्ण | बरे झालेले रुग्ण | मृत्यू | इतर कारणामुळे झालेले मृत्यू | ॲक्टिव्ह रुग्ण |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | परभणी | ५२४४९ | ५११७२ | १२३५ | १९ | २३ |
| २२ | हिंगोली | १८४८१ | १७९६९ | ५०७ | १ | ४ |
| २३ | नांदेड | ९०४८९ | ८७८१२ | २६५८ | ७ | १२ |
| २४ | उस्मानाबाद | ६८००९ | ६५९०९ | १९८१ | ११६ | ३ |
| २५ | अमरावती | ९६२३५ | ९४६१८ | १५९७ | २ | १८ |
| २६ | अकोला | ५८७९४ | ५७३४८ | १४२६ | ४ | १६ |
| २७ | वाशिम | ४१६७१ | ४१०२८ | ६३७ | ३ | ३ |
| २८ | बुलढाणा | ८५५९७ | ८४७७४ | ८०२ | ६ | १५ |
| २९ | यवतमाळ | ७५९९६ | ७४१८३ | १७९९ | ४ | १० |
| ३० | नागपूर | ४९३७७५ | ४८४५१२ | ९१२८ | ७१ | ६४ |
| ३१ | वर्धा | ५७३६६ | ५५९७९ | १२१८ | १६५ | ४ |
| ३२ | भंडारा | ६००८८ | ५८९५३ | ११२३ | १० | २ |
| ३३ | गोंदिया | ४०५२५ | ३९९४८ | ५६९ | ७ | १ |
| ३४ | चंद्रपूर | ८८९८५ | ८७३९७ | १५६४ | ४ | २० |
| ३५ | गडचिरोली | ३०४५५ | २९७४८ | ६६९ | ३३ | ५ |
|  | इतर राज्ये/ देश | १४४ | ३१ | १११ | २ | ० |
|  | **एकूण** | **६६३५६५८** | **६४८३४३५** | **१४०९९७** | **३६७१** | **७५५५** |

*(टीप – बरे झालेल्या रुग्णांची जिल्ह्यानिहाय माहिती कोविड पोर्टलवरुन घेण्यात येते. जिल्हास्तरावरुन सदर माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.)*

**करोना बाधित रुग्ण –**

आज राज्यात ६७८ नवीन रुग्णांची नोंद झाली. आता राज्यातील करोना बाधित रुग्णांची एकूण संख्या ६६,३५,६५८ झाली आहे. राज्यातील जिल्हा आणि मनपानिहाय रुग्णांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे-

| अ.क्र | जिल्हा/महानगरपालिका | बाधित रुग्ण | | मृत्यू | |
|---|---|---|---|---|---|
| | | दैनंदिन | एकूण | दैनंदिन | एकूण |
| १ | मुंबई महानगरपालिका | १८० | ७६२८७४ | २ | १६३३६ |
| २ | ठाणे | १२ | १०१०२८ | ० | २२१८ |
| ३ | ठाणे मनपा | २१ | १४४८६३ | ० | २१२३ |
| ४ | नवी मुंबई मनपा | २१ | १२१४०८ | ० | २०१० |
| ५ | कल्याण डोंबवली मनपा | १२ | १५३२२८ | ० | २८६६ |
| ६ | उल्हासनगर मनपा | १ | २२०२३ | १ | ६६१ |
| ७ | भिवंडी निजामपूर मनपा | ० | ११३१९ | ० | ४८९ |
| ८ | मीरा भाईंदर मनपा | ७ | ५९९७८ | १ | १२०३ |
| ९ | पालघर | ६ | ५६४१८ | ० | १२३३ |
| १० | वसईविरार मनपा | ८ | ८२२०१ | ० | २०६५ |
| ११ | रायगड | ११ | ११८४८० | १७ | ३२७६ |
| १२ | पनवेल मनपा | १९ | ७८२१३ | १ | १४२७ |
| | ठाणे मंडळ एकूण | २९८ | १७१२०३३ | २२ | ३५९०७ |
| १३ | नाशिक | १२ | १६४१२४ | ० | ३७४१ |
| १४ | नाशिक मनपा | १६ | २३७८३२ | २ | ४६४२ |
| १५ | मालेगाव मनपा | ० | १०१५६ | ० | ३३६ |
| १६ | अहमदनगर | ४१ | २७३०७० | ० | ५४९१ |
| १७ | अहमदनगर मनपा | ८ | ६८५७३ | ० | १६३५ |
| १८ | धुळे | ० | २६२१८ | ० | ३६२ |
| १९ | धुळे मनपा | ० | १९९६९ | ० | २९३ |
| २० | जळगाव | ० | १०७०७५ | ० | २०५७ |
| २१ | जळगाव मनपा | ० | ३२९०२ | ० | ६५७ |
| २२ | नंदूरबार | ३ | ४००१९ | ० | ९४८ |
| | नाशिक मंडळ एकूण | ८० | ९७९९३८ | २ | २०१६२ |
| २३ | पुणे | ८६ | ३६७८६८ | ६ | ६९७८ |
| २४ | पुणे मनपा | ८२ | ५२३२४३ | ० | ९२१७ |
| २५ | पिंपरी चिंचवड मनपा | ३५ | २६९८७८ | ० | ३५१२ |

| अ.क्र | जिल्हा/महानगरपालिका | बाधित रुग्ण | | मृत्यू | |
|---|---|---|---|---|---|
| | | दैनंदिन | एकूण | दैनंदिन | एकूण |
| २६ | सोलापूर | ९ | १७८४३४ | ० | ४१०८ |
| २७ | सोलापूर मनपा | ५ | ३२७११ | ० | १४७२ |
| २८ | सातारा | १५ | २५११०६ | ० | ६४७५ |
| | पुणे मंडळ एकूण | २३२ | १६२३२४० | ६ | ३१७६२ |
| २९ | कोल्हापूर | १ | १५५३३७ | ० | ४५४३ |
| ३० | कोल्हापूर मनपा | ० | ५१४६५ | ० | १३०५ |
| ३१ | सांगली | ४ | १६४१८४ | २ | ४२७७ |
| ३२ | सांगली मिरज कुपवाड मनपा | १ | ४५७१० | ० | १३५२ |
| ३३ | सिंधुदुर्ग | १ | ५२९५३ | ० | १४४१ |
| ३४ | रत्नागिरी | २ | ७९१११ | ० | २४९१ |
| | कोल्हापूर मंडळ एकूण | ९ | ५४८७६० | २ | १५४०९ |
| ३५ | औरंगाबाद | ५ | ६२३५० | ० | १९२७ |
| ३६ | औरंगाबाद मनपा | २ | ९३२६९ | ० | २३२७ |
| ३७ | जालना | ६ | ६०७१५ | ० | १२१० |
| ३८ | हिंगोली | ० | १८४८१ | ० | ५०७ |
| ३९ | परभणी | २ | ३४१८१ | ० | ७९३ |
| ४० | परभणी मनपा | ० | १८२६८ | ० | ४४२ |
| | औरंगाबाद मंडळ एकूण | १५ | २८७२६४ | ० | ७२०६ |
| ४१ | लातूर | ३ | ६८५२३ | ० | १७९९ |
| ४२ | लातूर मनपा | ८ | २३७७५ | ० | ६४२ |
| ४३ | उस्मानाबाद | ३ | ६८००९ | ० | १९८१ |
| ४४ | बीड | ७ | १०३९९६ | १ | २८२८ |
| ४५ | नांदेड | १ | ४६५४७ | ० | १६२५ |
| ४६ | नांदेड मनपा | ३ | ४३९४२ | ० | १०३३ |
| | लातूर मंडळ एकूण | २५ | ३५४७९२ | १ | ९९०८ |
| ४७ | अकोला | ० | २५५३५ | ० | ६५५ |
| ४८ | अकोला मनपा | ० | ३३२५९ | ० | ७७१ |
| ४९ | अमरावती | २ | ५२४७६ | १ | ९८८ |
| ५० | अमरावती मनपा | २ | ४३७५९ | १ | ६०९ |
| ५१ | यवतमाळ | १ | ७५९९६ | ० | १७९९ |

| अ.क्र | जिल्हा/महानगरपालिका | बाधित रुग्ण | | मृत्यू | |
|---|---|---|---|---|---|
| | | दैनंदिन | एकूण | दैनंदिन | एकूण |
| ५२ | बुलढाणा | ३ | ८५५९७ | ० | ८०२ |
| ५३ | वाशिम | ० | ४१६७१ | ० | ६३७ |
| | अकोला मंडळ एकूण | ८ | ३५८२९३ | २ | ६२६१ |
| ५४ | नागपूर | २ | १२९५९४ | ० | ३०७५ |
| ५५ | नागपूर मनपा | ७ | ३६४१८१ | ० | ६०५३ |
| ५६ | वर्धा | ० | ५७३६६ | ० | १२१८ |
| ५७ | भंडारा | ० | ६००८८ | ० | ११२३ |
| ५८ | गोंदिया | ० | ४०५२५ | ० | ५६९ |
| ५९ | चंद्रपूर | ० | ५९३६६ | ० | १०८८ |
| ६० | चंद्रपूर मनपा | २ | २९६१९ | ० | ४७६ |
| ६१ | गडचिरोली | ० | ३०४५५ | ० | ६६९ |
| | नागपूर एकूण | ११ | ७७११९४ | ० | १४२७१ |
| | इतर राज्ये /देश | ० | १४४ | ० | ११९ |
| | **एकूण** | **६७८** | **६६३५६५८** | **३५** | **१४०९९७** |

*(ही माहिती केंद्र सरकारच्या आय. सी. एम. आर.पोर्टलवर मान्यताप्राप्त प्रयोगशाळांनी भरलेल्या कोविड १९ बाधित रुग्णांच्या आकडेवारीनुसार तयार करण्यात आलेली आहे. प्रयोगशाळा अहवाल छाननी आणि त्यानुसार उपलब्ध होणारी आकडेवारी ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असल्याने राज्याच्या एकूण आकडेवारीमध्ये बदल होऊ शकतो.)*

## ओमिक्रॉन व्हेरियंट आणि करण्यात येणारी कार्यवाही -

*दिनांक २६ नोव्हेंबर २०२१ रोजी जागतिक आरोग्य संघटनेने दक्षिण आफ्रिका आणि इतर काही देशामध्ये आढळून आलेल्या कोविड १९ विषाणूच्या व्हेरियंट ला ओमिक्रॉन असे नाव दिले असून सदर व्हेरीयंट हा व्हेरीयंट ऑफ कंसर्न असल्याचे नमूद केले आहे. विषाणू मधील या जनुकीय बदलामुळे त्याला काही विशेष गुणधर्म प्राप्त होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.या बदलामुळे विषाणू प्रसाराचा वेग वाढल्याचे सध्या दिसत असून त्यामुळे आजाराची तीव्रता वाढेल का किंवा हा नवा विषाणू प्रतिकार शक्ती भेदून संसर्ग करू शकेल का, याबाबत आताच निश्चित भाष्य करणे कठीण असले तरी येत्या दोन आठवड्यात या बदल अधिक माहिती मिळू शकेल.*

*या पार्श्वभूमीवर, भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आंतरराष्ट्रीय प्रवाशांचे विशेष सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. युरोप आणि ज्या देशांमध्ये ओमिक्रॉन आढळून आला आहे असे इतर ११ देशांमधून जे प्रवासी भारतात येत आहेत त्या प्रत्येकाची आर टी पी सी आर टेस्ट करण्यात येत असून जे प्रवासी यामध्ये पॉझिटिव्ह आढळतील त्यांचे नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठविण्यात येणार आहेत. जे प्रवासी आर टी पी सी आर निगेटिव्ह आढळतील त्यांनाही ७ दिवसांच्या क्वारंटाईननंतर पुन्हा टेस्ट करण्यात येईल आणि ते कोविड बाधित आढळल्यास त्यांच्या नमुन्याचे जनुकीय क्रमनिर्धारण करण्यात येणार आहे.*

*जे प्रवासी ओमिक्रॉन सापडलेल्या देशांव्यतिरिक्त इतर देशांतून येणार आहेत त्यांच्यातील देखील ५ टक्के प्रवाशांची प्रयोगशाळा तपासणी करुन त्यातील पॉझिटिव्ह नमुन्यांचे जनुकीय क्रमनिर्धारण करण्याचे भारत सरकारने आदेशित केले आहे.*

*सध्या राज्यात आफ्रिका अथवा इतर जोखमीच्या देशातून आलेले ६ प्रवासी कोविड बाधित आढळलेले आहेत. कल्याण डोंबिवली, मुंबई महानगरपालिका, मीरा भाईंदर मनपा आणि पुणे या भागात आफ्रिका आणि इतर जोखीमच्या देशातून आलेला प्रत्येकी एक प्रवासी कोविड बाधित आढळला असून या प्रवाशांचे प्रयोगशाळा नमुने जनुकीय क्रमनिर्धारणासाठी पाठविण्यात आले*

*आहेत तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात नायजेरियातून आलेले दोन प्रवासी कोविड बाधित आले असून त्यांचेही नमुने एन आय व्ही पुणे येथे जनुकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. या प्रवाशांच्या निकट सहवासितांचा शोध घेण्यात येत आहे. हे सर्व प्रवासी कोविड बाधित असले तरी लक्षणेविरहित अथवा सौम्य लक्षणे असणारे आहेत.*

*विषाणू मध्ये बदल होणे ही नैसर्गिक प्रक्रिया असून या बाबत जनतेने भीती न बाळगता आपल्या नेहमीच्या व्यवहारात कोविड अनुरुप वर्तनाचा अंगिकार सातत्याने करावा, मागील महिनाभरात जे प्रवासी आंतरराष्ट्रीय प्रवास करुन भारतात आले आहेत त्यांनीही आपल्याबाबत स्थानिक आरोग्य विभागास अवगत करावे तसेच ज्यांचे लसीकरण अद्याप अपुरे आहे अथवा ज्यांनी अद्याप लस घेतलेली नाही त्यांनी आपले लसीकरण त्वरेने पूर्ण करावे असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.*

| **हा अहवाल ३० नोव्हेंबर २०२१ च्या अद्ययावत आकडेवारीवरुन तयार करण्यात आलेला आहे.** | |
|---|---|
| राज्य नियंत्रण कक्ष | ०२०/२६१२७३९४ टोल फ्री क्रमांक १०४ |